# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## POSITIVE STORIES

---

### दिनांक 25.11.2018 ते 25.12.2018

### दिनांक 25.11.2018

**1) पो.स्टे. इमामवाडा पोलीसांची कामगीरी –**

पो.स्टे. इमामवाडा, नागपूर चे पोउपनि विनोद नरवाडे, हे दिनांक 23.11.18 रोजी 0030 वा चे सुमारास त्यांचे डि.बी. स्टाफसह पाहिजे–फरार आरोपीतांचा शोध घेत रात्रगस्त करीत असतांना आरोपी नामे 1) बंटी उर्फ राज नरेश मेहरोलीया, वय 21 वर्ष, रा. कापला वस्ती, इमामवाडा, 2) संदीप राजेश जाधव, वय 26 वर्ष, रा. इमामवाडा धोबीघाट, करबला, नागपूर हे एक एचपी कंपनीचे सिलेंडर घेवून पळत जात असतांना दिसून आले. त्यांना संशयावरून ताब्यात घेवून तपास केला असता दोन्ही आरोपीतांनी काही दिवसापुर्वी इमामवाडा वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वसाहत क्र. 2 येथुन रॉडचे सहायाने वसाहतीचे कुलूप तोडून आत ठेवलेले कार्यालयीन व संगणकीय सामान चोरी केले असल्याचे कबुल केले. पुढील तपासात आरोपीतांकडून 1) दोन प्रिंटर, 2) दोन मॉनिटर, 3) एक व्हिडीओ कॉन एलसीडी टिव्ही, 4) एक सिपीयु, 5) एक सिलेंडर असा एकुण 99,900 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद घटनेबाबत पो.स्टे. इमामवाडा येथे अपराध क्र. 107/18 कलम 454,457,380 भादंवि चा गुन्हा नोंद असून दोन्ही आरोपी पीसीआर मध्ये आहे.

दोन आरोपी पैकी बंटी उर्फ राज नरेश मेहरोलीया, वय 21 वर्ष, हा कुख्यात गुन्हेगार असून त्याचेवर जबरी चोरी, गंभीर दुखापत, वाहन चोरी असे गुन्हे दाखल आहेत.

सदरची महत्वपुर्ण कामगीरी मा. पोउपनि आयुक्त, परि क्र. 4, श्री निलेश भरणे, यांचे आदेशावरून सपोआ श्री आर. कापगते, सक्करदरा विभाग, वपोनि श्री रमाकांत दुर्गे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि विनोद नरवाडे, पोहवा परमेश्वर कडू, श्रीकांत ठाकुर, रामेश्वर कडवे, अनंत बुरडे, शरद चव्हान, नापोशि बाळु गिरी, नापोशि राहुल झाडे, पोशि सुशिल रेवतकर, विजय भोयर, किशोर येउल यांनी केली.




### दिनांक 26.11.2018

**2) पो.स्टे. सदर पोलीसांची कामगीरी –**

दिनांक 25/11/2018 रोजी यातील फिर्यादी पोहवा विनोद रघुराम तिवारी, हे रात्रपाळी कर्तव्यावर हजर असताना पेट्रोलींग दरम्यान त्यांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, तिनमुंडी चौक, सदर येथे एक इसम देशी रिव्हॉल्वर घेउन फिरत आहे. असे माहीतीवरून यातील

फिर्यादी यांनी नाईट ऑफीसर पोउपनि सौरभ पिगंळे, पोउपनि मयुर चौरसिया, नापोशी किशोर कांबे, पोशि. संदीप पांडे, विशाल, जगदीश, असे पिटर मोबाईल वाहनाने तात्काळ तिनमुंडी चौक, सदर येथे रवाना झाले. घटनास्थळी जाते वेळी दोन पंचाना बोलावुन नमुद माहीती सांगुन सदरील कार्यवाहीमध्ये पंच म्हणुन हजर राहण्याची विंनती केल्या वरून त्यांनी सहमती दिली असता त्यांना सोबत घेवुन सदर ठिकाणी गेले. पोलीसांना बघुन एक इसम वय अं. 23 वर्ष, अंगात टि शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅट घातलेला हा पळुन जाण्याच्या बेतात असतांना त्यास स्टाफचे मदतीने घेरव घालुन कायदेशिररित्या ताब्यात घेतले. त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अक्षय किशोर बैसवारे, वय 23 वर्षे, रा. गवळी पुरा, सिमेंटरोड, सदर, नागपूर, असे सांगीतले. त्याला तेथे येण्याचे कारण विचारले असता ते उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला. त्याचे वरील संशय बळावल्याने त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याने परिधान केलेल्या निळया रंगाचे जिन्स पॅन्ट चे आत कमरेजवळ एक पितळी देशी बनावटीचे रिव्हॉलवर मिळुन आले. नमुद रिव्हॉल्वर घनास्थळ व अंगझडती पंचनाम्या प्रमाणे जागीच जप्त केले. नमुद देशी रिव्हॉल्वर चे वर्णन बट पासुन बॅरेल टोका पर्यतची लांबी 17:5 सेमी, नळीचा आतील व्यास 0.9 सेमी, बाहेरिल व्यास 1.3 सेमी बॅरेलपासुन बट पर्यंतची बॅरेलला लंब उभी लांबी 10.4 सेमी, 6 रांउड्स चे चेंबर किंमत अं. 5000 रूपये असे आहे. नमुद इसमास सदर रिव्हाल्हर चा परवाना बाबत विचारले असता त्याने असा कोणताही परवाना त्याचे कडे नसल्याचे सांगीतले. नमुद घटनेची माहीती श्री सुनिल बोंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देण्यात आली व त्यांचे मार्गदर्षनानुसार सदर इसमास ताब्यात घेउन पोलीस स्टेशनला आणुन त्याचे वरील दाखल गुन्हे अभिलेखाची पडताळणी केली असता त्याचे विरूध्द शरीराविरूध्दचे गुन्हे दाखल असल्याचे निदर्षनात आले.

नमुद इसम नामे अक्षय किशोर बैसवारे, वय 23 वर्षे, रा. गवळी पुरा, सिमेंटरोड, सदर, नागपूर, याने विनापरवाना अग्निशस्त्र स्वतःचे ताब्यात बाळगुन मा. सह पोलीस आयुक्त यांचे मनाई आदेशाचे उल्लंघन केले आहे. करिता त्याचे विरूध्द सरतर्फे दिलेल्या रिपोर्ट वरून भारतीय हत्यार कायदा कलम 3 + 25, सहकलम 135 मपोका. अन्वये गुन्हा नोदविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान यातील आरोपी अक्षय किशोर बैसवारे, वय 23 वर्षे, रा. गवळी पुरा, सिमेंटरोड, सदर, नागपूर, याला दिनांक 26/11/2018 रोजी अटक करुन तीन दिवस पीसीआर मा. न्यायालया कडुन प्राप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 1, नागपूर शहर व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर शहर, यांच्या मार्गदर्षनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. सदर, श्री सुनिल बोंडे व पोलीस निरीक्षक श्री महेश बनसोडे यांच्या नेतृत्वात पोउपनि सौरभ पिंगळे, मयुर चौरसिया, व पोहवा विनोद तिवारी, नापोशी किशोर कांबे, पोशि संदीप पांडे, राजेश शेंडे, निलेश शेंदरे, विशाल, जगदीष, यांनी केली.

## <u>दिनांक 28.11.2018</u>

**<u>1) मा. पोलीस आयुक्त, यांचे अध्यक्षतेखाली नागपूर जिल्हा ॲटो चालक मालक संघटनांची प्रलंबीत समस्यांचे निराकरण करण्याकरीता आयोजीत केलेल्या बैठकीबाबत :</u>**

आज दिनांक 28.11.18 रोजी सायंकाळी 1730 वाजता पोलीस जिमखाना, सिव्हिल लाईन, नागपूर येथे मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. श्री भुषणकुमार उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्री राजतिलक रोषन, श्री बजरंग खरमाटे, प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर शहर, श्री श्रीपाद वाडेकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर ग्रामीण, श्री अतुल आदे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर शहर, श्री विनोद जाधव, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पुर्व विभाग यांच्या उपस्थीतीत नागपूर जिल्हा ॲटो चालक मालक महासंघ, टॅक्सी ॲटो रिक्षा चालक मालक संघ तसेच नागपूर शहरातील इतर विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच चालक यांच्या प्रलंबित समस्या जाणुन घेणे तसेच त्यांच्या मागण्यांचे निरांकरण करण्याकरीता बैठकीचे आयोजन केले होते.

सदर बैठकीमध्ये नागपूर शहरातील ऑटो रिक्षा चालकांच्या दैनंदिन जिवनात येणा–या समस्या या प्रश्नोत्तर स्वरूपात जाणुन घेतल्या त्यामध्ये ऑटो रिक्षा चालकांनी खालील मागण्यांचे निराकरण करण्याबाबत पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना निवेदन केले.

मागण्या :–

1) ओला, उबेर, जल्दी या अवैध्यरित्या चालणा–या चारचाकी वाहनांकडे टुरिस्ट परवाना असल्याने त्यांच्यावर कारवाई करून त्वरीत बंद करण्यात यावे.

2) नोंदणी कृत नसलेले ई रिक्षा त्वरीत बंद करण्यात यावे.

3) अवैध्य प्रवसी वाहतुक बंद करण्यात यावी.

4) प्रवास्याच्या साईकरीता ऑटो रिक्षा थांबण्याची व्यवस्था त्वरीत करण्यात यावी.

5) मिटर दर पत्रकामध्ये वाढकरून पहिला टप्पा कि.मी. 20/– व नंतरचा टप्पा करीता पर कि.मि. 20 रू करण्यात यावा.

6) अजनी रेल्वे स्टेशन, गणेशपेठ बस स्थानकर, ईतवारी रेल्वे स्टेशन, पुर्व गेट रेल्वे स्टेशन संत्रा मार्केट या ठिकाणी रेल्वे स्टेशन प्रमाणे प्रिपेड ऑटो रिक्षा योजना राबविण्यात यावी.

7) शेअर–ए, ऑटो रिक्षा योजना (तिन प्रवास्याकरीता) शहरातील गर्दीच्या ठिकाणी राबविण्यात यावी.

8) सहा आसनी डिझेल ऑटो रिक्षा तसेच तिन असानी ऑटो रिक्षा चालकांनी आसन क्षमते मध्ये बदल करून नऊ आसन क्षमतेचा सिटा बसवून ज्यादा प्रवासी वाहतुक सुरू असुन त्यांच्या वर कारवाई करण्यात यावी.

9) तिन सिटर ऑटो रिक्षांकरीता थांब्याची पाहणी करून ती तात्काळ उपलब्ध करून दयावी. वगैरे समस्या ऑटो रिक्षा चालकांनी मांडल्या.

सदर समस्यांचे निराकरण करतांना प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर शहर व ग्रामीण यांनी शहरात तसेच ग्रामीण भागात सध्या अवैध्य रित्या चालणा–या ऑटो रिक्षा तसेच मुदत संपलेल्या (स्क्रॅप झालेल्या ऑटो रिक्षा, परवाना नसलेल्या रजिस्ट्रेशन नसलेल्या) यांची पोलीस दलामार्फत संयुक्त रित्या उपक्रम राबवून जास्तीत जास्त ऑटो रिक्षावर कारवाई करून ती जप्त करण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच ओला, उबेर, जल्दी या सारख्या अवैध्य प्रवासी वाहतुक करणा–या वाहनांवर करावयाचा कारवाई बाबत सध्या न्यायालयात प्रलंबीत आहेत. तरी आपण उपस्थीत केलेल्या सर्व मागण्यांचा शासनाकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्री राजतिलक रोशन, यांनी समस्यांचे निराकरण करतांना सांगीतले कि, आपणास कोणतेही अडी–अडचणी किंवा समस्या उपस्थीत झाल्यास आपण तात्काळ ट्रफिक कंट्रोल तकार निवारण मोबाईल कमांक 90111387100 याचे वर संपर्क साधण्यास सांगीतले. तसेच आपल्या मागण्यानुसार मेन रेल्वे स्टेशन पाठीमागील बाजुस, अजनी रेल्वे स्टेशन, बस स्थानक गणेशपेठ येथे काही दिवसातच प्रिपेड सेवा सुरू करण्यात येईल. तसेच नागपूर शहरामध्ये प्रवास्यांच्या सोईकरीता ऑटो रिक्षा थांब्याची सर्वेपाहणी करण्यात येईल व तेथे थांब्याकरीता महानगर पालीक नागपूर यांचेशि चर्चा करून योग्यतो निर्णय घेण्यात येईल. तसेच अवैध्य वाहतुकीवर करण्यात येणा–या कारवाईवर आम्ही स्वतः लक्ष ठेवून त्याचा संबंधीतांकडून वेळोवेळी आढावा घेतला जाईल.

मा. पोलीस आयुक्त, डॉ. श्री भुषणकुमार उपाध्याय यांनी संमस्यांचे निराकरन करतांना सांगितले कि, नागपूर शहरात सध्या प्रवासी वाहतुकीचे प्रमाण वाढलेले असून मला आपल्या समस्याचे पुर्णतः जाणीव आहे अवैध्य वाहतुकीला रोखण्याकरीता आगामी काळात जास्तीत जास्त कडक कारवाई करण्यावर भर देण्यात येईल तसेच येत्या दोन आठवडयात नागपूर शहर व आसपासच्या परिसरात अवैध्यरित्या विनापरवाना, स्क्रॅप झालेले तसेच विना लायसन्स चालत असलेल्या ऑटो रिक्षा तसेच ईतर प्रवासी वाहतुकीवर आरटीओ व ट्राफिक पोलीस यांची पथके तयार करून कारवाई करण्यात येईल. तसेच आपल्या मागणी नुसार अजनी रेल्वे स्टेशन, गणेशपेठ बस स्थानक, पुर्व गेट रेल्वे स्टेशन या ठिकाणी त्वरीतच प्रिपेड ऑटो रिक्षा सेवा सुरू करण्यात येईल. तसेच आपल्या मागणी नुसार दर टप्याकरीता पत्रकांमध्ये वाढ करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी यांचे सोबत मिटींग घेण्यात येईल.

त्याकरीता आपण सर्वांनी नागपूर शहर वाहतुक शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन केले.

सदर कार्यक्रमाकरीता नागपूर शहरातील सर्व ऑटो चालक मालक महासंघाचे पदाधिकारी तसेच नागपूर शहर वाहतुक शाखेतील सर्व वपोनि ईतर अधिकारी व कर्मचारी हजर होते. सदर कार्यक्रमाचे स्वागत व आभार प्रदर्शन मा. श्री जैयेश भांडारकर वपोनि सिताबर्डी वाहतुक विभाग यांनी केले.





## दिनांक 30.11.2018

**1) गुन्हे शाखा युनिट क्र. 3 पोलीसांची कामगीरी – गोडावून मधून सुपारी चोरी करणारी टोळी जेरबंद**

फिर्यादी विजय घनश्यामदास आमेसर वय 47 वर्षे रा छापरूनगर, सिंधी कॉलनीचे मागे पोस्टे लकडगंज नागपुर यांनी दिनांक 28/11/2018 रोजी पोस्टे लकडगंज नागपुर येथे येवुन तक्रार दिली की, त्यांचे प्लॉट नं 33, कुंभारटोली चौक, हिमालय बिल्डींग क्र 1 चे बाजुचे गोडाऊन मध्ये ठेवलेली सुपारीचे अंदाजे 60 बोरी किमंत अंदाजे 6,72,000 रू चा माल दिनांक 20.10.2018 ते 13.11. 2018 चे 10.00 वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरांनी गोडाऊनचे कुलूप तोडुन चोरून नेला अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे लकडगंज येथे कलम 461,454,457,380, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करतांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती वरून आरोपी क्र 1) संदेश उर्फ गौरव चंद्रमणी मनोहरे, वय 24 वर्ष, 2) कमलेश पंचु यादव, वय 30 वर्ष, 3) हुकूमचंद उर्फ भुपेंद्र अनुज शाहु, वय 23 वर्ष, 4) मुकेश उर्फ नन्हे विवेक सनकाळे, वय 26 वर्ष, 5) वसीम शेख रूस्तम शेख, वय 22 वर्ष, 6) भिमराव संजय घुमडे, वय 22 वर्ष, 7) चंदन भगवान ठाकुर, वय 22 वर्ष, 8) मिथुन गुंडेराव श्रीरामे, वय वय 29 वर्ष, 9) लक्ष्मण उर्फ सिंधी दयाराम सोमाणी, वय 23 वर्ष, 10) निलेश उर्फ गोलू शेषराव काकडे, वय 25 वर्ष, 11) सोनु राजू पाठक, वय 24 वर्ष, व 12) सुरज विलास लांजेवार, वय 22 वर्ष सर्व रा. कुंभारटोली, पोस्टे नंदनवन नागपुर यांना ताब्यात घेतले ते मागील एक ते दिड महीण्यापासून वेळोवेळी वेगवेगळया ग्रुपने जावून फिर्यादीचे गोडाऊन मधुन सुपारीच्या एकूण 60 बोरे चोरी केल्याचे सांगितले. गुन्हा करतांना वापरलेले 1) टाटा एस वाहन क्र. एमएच/40/एन/7433 2) महिंद्रा अल्फा 3 व्हीलर ऑटो क्र. एमएच/49/डी/6236 हे आरोपीतां कडून जप्त करण्यात आले. फिर्यादीचे गोडाऊन मधुन सुपारीच्या बोरी चोरी केलेला मुददेमाल आरोपींनी तिन दुकानदारांना विकाल्याचे सांगीतल्याने त्या तिन दुकानदाराकडून गुन्हयातील 60 बोरी सुपारीचा मुददेमाल, एकुण वजनी 3,600 किलोग्रॅम किंमती 5,04000 रू चा तसेच जप्त टाटा एस वाहन क्र. एमएच/40/एन/7433 किमंती अं 3,00,000 रू. महिंद्रा अल्फा 3 व्हीलर ऑटो क्र. एमएच/49/डी/6236 किमंती अं 1,50,000 रू असा एकुण किमंती 9,54,000 रू चा मुददेमाल. जप्त करण्यात आला तसेच चोरीचा माल विकत घेणारे 3 दुकानदारावर सुध्दा कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या 24 तासाचे आत गुन्हा उघडकिस आणला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उप आयुक्त श्वेता खेडकर, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. संभाजी कदम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जगवेंद्रसिंग राजपुत, सपोनि, ज्ञानेश्वर भेदोडकर, मपोउपनि, मंगला

मोकाशे पोहवा, शत्रृघ्न कडू, शैलेष ठवरे, अनिल दुबे,सुरेश हिंगणेकर नापोशि श्याम कडू, अतुल दवंडे, पोशि मिलींद नारसन्ने, शरीफ शेख, फिरोज शेख यांनी केली आहे.



## दिनांक 02.12.2018

**1) पो.स्टे हुडकेश्वर पोलीसांची कामगीरी :**

30 वर्षीय पिडीत फिर्यादी यांनी पो.स्टे. हुडकेश्वर नागपूर शहर येथे तक्रार दिली की तिचे पहिले पतीसोबत घट्स्फोट झालेला असून पिडीत फिर्यादीने जानेवारी 2018 मध्ये शादी डॉटकॉम वरून आरोपी अमित प्रविण घरडे, वय 35 वर्ष रा. सुदर प्लाझा, एफ 3, वाडरी फाटा घुग्गुस रोड चंदपूर याने पिडीत फिर्यादी सोबत फोनवर संपर्क साधून त्याचे सुध्दा पत्नी सोबत घटस्फोर्ट झालेला आहे. लग्न झाल्या पासून त्याचे पत्नीला मुल बाळ झाले नाही. त्याचे पत्नीने सुध्दा दुसरे लग्न केले आहे. फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये जवळीक वाढल्याने दोघांमध्ये संबध स्थापित झाले. त्यानंतर आरोपीस लग्न करण्यास फिर्यादीने म्हटले असता आरोपी हा नकार देत असल्याने फिर्यादीने आरोपीस त्याचे विरूध्द पोलीसात तक्रार देतो असे म्हटले असता आरोपीने फिर्यादी सोबत लग्न करण्याची तयारी दर्शवून फिर्यादी सोबत लग्न केले. तसेच पिडीत फिर्यादीला वेळोवेळी वेगवेगळे कारण सांगुन 1,00,000 रूपये घेवून पिडीत फिर्यादी सोबत दुसरे लग्न झालेले असतांना सुध्दा आणखी एक घटस्फोटीत मुलीला शादी डॉ कॉम या ऑन लाईन विवाह संस्थेच्या माध्यमातून त्याने त्याचे पहिल्या पत्नी सोबत घटस्फोट असे खोटे सांगून आणि स्वतः दुसरे लग्न केले आहे हे लपवून तिसऱ्या पिडीत मुली सोबत तिसरे लग्न करून फसवणूक केली आहे. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन हुडकेश्वर नागपूर शहर येथे कलम 420,417,493,494,495,496 भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यातील नमूद आरोपी यांने पहिल्या पत्नी सोबत लग्न झाल्यानंतर तिचे सोबत कायदेशीर घटस्फोट न घेता. पिडीत फिर्यादी हिला पहील्या पत्नी सोबत घटस्फोट घेतल्याचे सांगून पिडीत फिर्यादी सोबत संबध स्थापित करून दुसरे लग्न केल्यानंतर तिचे सोबत सुध्दा घटस्फोट न घेता तिसऱ्या मुली सोबत लग्न केले आहे असे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयातील आरोपीला गुन्हयात अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सूरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. 4 श्री. निलेश भरणे, मा.सहा. पोलीस आयुक्त, अजनी विभाग, श्री.आर.एस. धामणेरकर, मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री सत्यवान माने, दुपोनी श्री.किशोर चौधरी, पो.स्टे. हुडकेश्वर यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनी एस.बी.कदम, मपोउपनिरी शुभांगी मोहारे, पोउपनिरी पंकज निळकंठे, नापोशि. परेश दिवटेलवा, पोशि. मयुर सातपुते, दिपक सारंग यांनी कारवाई करून सदर गुन्हयातील आरोपीला 12 तासाचे आत अटक करण्यात आले.

## दिनांक 03.12.2018

**1) पो.स्टे. एमआयडीसी पोलीसांची कारवाई –**

मा. पोलीस आयुक्तयांच्या आदेशाने नागपुर शहरात राबविण्यात येत असलेल्या वाईप आउट 2 अभियाना अंतर्गत मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ क्र. 1 श्री विवेक मासाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री सिध्दार्थ शिंदे, वपोनी पोस्टे. एमआयडीसी श्री भारत क्षीरसागर यांच्या आदेशाने व

मार्गदर्षनाने पोउपनि जाधव, पोहवा विनायक, नापोशी नितीन, मंगेश सह पोस्टे. हददीत पेट्रोलींग दरम्यान वाईप आउट ऑपरेशन पाहीजे फरार आरोपी, गुन्हे अभिलेखावरील आरोपी, तडीपार आरोपी यांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, बहुजन नगर, भिमनगर येथील पहाडीवर कलम 457,380,34 भादवी मधील फरार आरोपी असल्याची माहीती प्राप्त झाली. पोउपनि जाधव स्टाफ सह आरोपीतांचा शोध घेण्याकरीता वर नमुद ठिकाणी गेलो असता तेथे तिन इसम मिळुन आले. त्यांना आपले नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 1) मुकेश वसंता हनवते, वय 19 वर्ष रा. भिमनगर एमआयडीसी 2) 17 वर्ष वयोगटातील विधीसंघर्षग्रस्त बालक, 3) सोनु उर्फ नवरेज रफीक खान वय 18 वर्ष रा. राजीवनगर एमआयडीसी नागपुर असे सागितल्याने व त्यांना नमुद गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना नमुद गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. आणि त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केले असता यातील आरोपी क्र 1 याने सांगीतले की, सदरचा गुन्हा आम्ही तिघे व आमचे सोबत 16 वर्ष वयोगटातील विधीसंघर्षग्रस्त बालक याचे सह मिळुन केला आहे असे सांगीतले वरुन नमुद आरोपीत यांना सदर गुन्हात अटक करण्यात आले.

गुन्हयातील अटक आरोपी क्र. 1) मुकेश वसंता हनवते, वय 19 वर्ष, रा. भिमनगर एमआयडीसी, 2) सोनु उर्फ नवरेज रफीक खान, वय 18 वर्ष, रा. राजीवनगर यांना गुन्हयातील चोरी गेलेला मुददेमाल याबाबत अधिक तपास करणे असल्याने मा. न्यायालयाकडुन आरोपीतांचा पीसीआर मंजुर केला. व तपासादरम्यान आरोपीने या गुन्हयाव्यतिरीक्त पोस्टे. हददीत आनखी दोन ठिकाणी गुन्हे केल्याचे कबुल केले वरुन पोस्टे. अभिलेखावर पाहणी केली असता अप क्र. 599/18 कलम 379,34 भादवी अप क्र.603/18 कलम 457,380,34 भादवी प्रमाणे गुन्हे दाखल होते. या गुन्हयातील मुददेमाल सदर पीसीआर दरम्यान यातील आरोपीतांकडुन 1) दिड तोळा सोन्याची जुनी मोहर/लॉकेट 15 ग्राम किं.अं 15,000 रू 2) 2 सॅमसंग कपंनीचा मो. कि.अं. 1,000 रु प्रमाणे ऐकुण 2,000 रू, 3) 1 साधा मोबाईल लावा कंपनीचा कि.अं. 1,000 रू 4) गुन्हयात वापरलेले वाहन काळया रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र. एमएच 40/एम/9578 कि.अं. 35,000 रू 5) oppo A 37 F कंपनी का ग्रे कलर का मोबाईल कि.अं. 7,500, 6) 1 सोन्याची नाकातील नत कि.अं. 500 रु, 6) 1 जोड सोन्याचे कानातील टॉप्स कि.अं. 3,000 रु, 7) 2 जोड चांदीचे पायल कि.अं.1,500 रु, 8) 1 जोड लहान मुलाचा चांदीचा कडा कि.अं. 300 रु, 9) 8 नग चांदीचे सिक्के कि.अं.400 रु, 10) oppo A3S लाल रंग का मोबाईल कि.अं. 12,000 रु, 11) कार्बन K 9 मोबाईल कि.अं. 1,000 रु, 12) LAVA KK–10 मोबाईल कि.अं. 1,000 रू जप्त करण्यात आला. नमुद गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ क्र. 1 श्री विवेक मासाळ, मा. सहा.पोलीस आयुक्त श्री.सिध्दार्थ शिंदे, यांच्या मार्गदर्षनाखाली तपास पथक एमआयडीसी मधील पोउपनि जाधव, पोहवा विनायक, बाळा, चंद्रशेखर, नापोशि नितीन, मंगेश, रितेश यांनी केला आहे.

<u>2) वाहतुक पोलीसांनी केलेली कारवाईबाबत –</u>

<u>अ)</u> नागपूर शहरातील रस्त्यावर वाहने चालवित असतांना ब–याच वाहन चालकांमध्ये वाहतूकीचे नियम तोडण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्याप्रमाणे पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत नागपूर शहर वाहतुक नियंत्रण शाखेतर्फे आमचे मार्गदर्शनाखाली विविध माध्यमाने जनजागृती करण्यात आलेली आहे परंतु बरेच ऑटो चालक हे वाहतुक नियमांचे सर्रास उल्लघंन करीत असल्याने स्वतःकरीता आणि इतर लोकांकरीता धोका निर्माण करीत असल्याने प्राणांतीक अपघाताची शक्यता बळावते. या प्रवृत्तीस प्रतिबंध व्हावा याकरीता डॉ. भूषणकुमार उपाध्याय, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी दिलेल्या निर्देशान्वये वाहतूक नियंत्रण शाखा व प्रादेशीक परिवहन विभाग, नागपूर शहर तसेच नागपूर ग्रामीणतर्फे अधिकारी श्री पाटील, खरे, मुघल, महाजन यांचे मार्फतीने दि. 01.12.2018 रोजी पासुन बिना परवाना प्रवासी वाहतुक करणारे ऑटो, खाजगी ऑटो, आसन क्षमतेमध्ये बदल करून प्रवासी वाहतुक करणारे, कालबाहय झालेले ऑटो, वाहन चालकां विंरुध्द संयुक्त विशेष मोहिम राबविण्यात आली. त्या दरम्यान खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| दिनांक | एकुण केसेस | डिटेन वाहने |
|---|---|---|
| 01.12.2018 | 28 | 09 |
| 02.12.2018 | 25 | 09 |

| | | |
|---|---|---|
| 03.12.2018 | 39 | 15 |
| **एकुण** | 92 | 33 |

संयुक्त विशेष मोहिम अंतर्गत वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे एकुण 92 ऑटो वाहन चालकांवर कारवाई करण्यात आलेली आहे तरी यापुढे सतत संयुक्त कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याने, वाहन धारकानी याची नोंद घेवुन आपले विरूद्ध होणारी कारवाई टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे पालन करावे आणि स्वतःला सुरक्षित ठेवावे असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे आणि पोलीसांना सहकार्य करावे.

ब) नागपूर शहरातील रस्त्यावर वाहने चालवित असतांना ब–याच वाहन चालकांमध्ये वाहतूकीचे नियम तोडण्याची प्रवृत्ती दिसून येते. करीता नागपूर शहरात वाहन चालकांमध्ये शिस्त यावी, त्यांनी आपले ताब्यातील वाहन चालविंताना नेहमी हेल्मेटचा वापर करून वाहतुक नियमांचे पालन करावे यासाठी पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत नागपूर शहर वाहतुक नियंत्रण शाखेतर्फे डॉ. भूषणकुमार उपाध्याय,पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांचे निर्देशान्वये आमचे मार्गदर्शनाखाली विविध माध्यमाने जनजागृती करण्यात येते. दि. 02.12.2018 रोजी दुपारी 13.00 वा. लकडगंज वाहतुक शाखेतील पोलीस निरीक्षक,श्री. अशोक मेश्राम, पोउपनि श्री. मोटे, आणि 23 कर्मचारी यांनी टेलीफोन एक्सचेंज चौक येथे वाहन चालकांना वाहतूकीचे नियम समजावुन जनजागृती केली. चौकामध्ये स्टॉप लाईनवर उभ्या असलेल्या एकूण 600 वाहन चालकांना, वाहन चालविंताना हेल्मेट परिधान करणे किती आवश्यक आहे हे हेल्मेट परिधान न करणारे वाहन चालकांना ''गुलाब पुष्प'' देवुन गांभीर्य समजावुन सांगीतले. तसेच इतर वाहतुक नियमांबाबत देखील जनजागृती करीता झेब्रॉ क्रॉसिंग हे पादचारी यांना रस्ता ओलंडण्यासाठी असून त्यावर आपले वाहन उभे आहे, ते मो.वा.का. कलम 237 अन्वये गुन्हा होत असून कलम 177 प्रमाणे 200/– रू. दंडास पात्र आहे, असे वाहन चालकांना समजाविले व वाहतूक नियमांचा प्रचार व प्रसार केला. जनतेचे देखील यामध्ये मोलाचे सहकार्य लाभले.

तरी वाहन धारकानी याची नोंद घेवुन आपले विरूद्ध होणारी कारवाई टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे पालन करावे आणि स्वतःला सुरक्षित ठेवावे असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे आणि वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.





## दिनांक 05.12.2018

**3) पोलीस आयक्तालय नागपूर शहर व सेंट पॉल स्कुल यांचे संयुक्त विद्यमाने "रस्ता सुरक्षा " या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धा आयोजित केलेबाबत :**

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. श्री. भुषणकुमार उपाध्याय, यांच्या प्रेरणेने व मा. पोलीस उपायुक्त, वाहतुक विभागचे श्री. राजतिलक रौशन, यांच्या नेतृत्वात रस्ता सुरक्षा दलाचे पोनि वजीर शेख व सेंट पॉल स्कुल हुडकेश्वरचे संचालक राजाभाउ ताकसांडे यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा या विषयावर भव्य चित्रकला व घोषवाक्य स्पर्धा सेंट पॉल स्कुल येथे दि. 05.12.18 चे 0900 ते 1100 या वेळेत आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये साउथ पॉईन्ट हायस्कुल, राजेद्र हायस्कुल, मानवता हायस्कुल, सिध्देश्वर गायत्री हायस्कुल, मेजर हेमंत जकाते हायस्कुल, गायत्री कॉन्व्हेट, नागपुरे हायस्कुल, शरद पवार

महाविद्यालय व सेंट पॉल स्कुल या शाळांच्या 700 विद्यर्थीनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात मा. पोलीस आयुक्त यांनी मुलांनो कस काय चाललय असे मराठीतुन विचारून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन केले. तसेच मुलांनी भविष्यात रहदारीचे नियम पाळल्यास अपघात होणार नाहीत तसेच भविष्यात कायद्याचे पालन करण्याबाबत व पोलीसांशी सलोख्याचे वागणुक ठेवण्याचे आवाहान केले. सेंट पॉल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी गायलेले गित व वाद्यवृद यांचही विशेष कौतुक केले.

तसेच याप्रसंगी मा. पोलीस उपायुक्त श्री. राजतिलक रौशन यांनीही विद्यार्थ्यांना रहदारी नियमांचे पालन करण्याचे आवाहन करून मार्गदर्शन केले.

यावेळी चाटे क्लासेस चे प्रा. गोविंद चाटे, हिरो मोटो कॉपचे एरिया मॅनेजर री. निलेश बोराडे यांनीही स्पर्धेसाठी साहित्य पुरवुन सहकार्य केल्याने त्यांना शाल व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. मुनलाईट स्टुडिओ चे संचालक श्री उमेश वर्मा यांचीही विशेष उपस्थिती होती.

सदर स्पर्धेमधील विजेते यांना मा. पोलीस आयुक्त, यांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. सेंट पॉल शाळेचे बॅडपथक, आरएसपी विद्यार्थी व गायनवृद यांनी उत्कृष्ठ शिस्त व कौशय यावेळी दाखवल्याने मा. पोलीस आयुक्त यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रस्ता सुरक्षा दलाचे पोहवा देठे, नापोशि निलेश ठाकरे, अतुल आगरकर, शांताराम ठोंबरे, महिला कर्मचारी स्नेहल, मंजुषा, प्रिती यांनी परिश्रम घेतले.











## <u>दिनांक 07.12.2018</u>

### 1) पो.स्टे. प्रतापनगर पोलीसांची कामगिरी –

दि. 05.12.18 चे 1910 वा चे सुमारास फिर्यादी नापोशि गयाप्रसाद बाबुलाल यादव, वय 43 वर्ष पो.स्टे. प्रतापनगर व सोबत पोशि संदीप यादव, पोशि राहुल टापरे, श्रीकांत कनोजिया, हे बिटमार्शल डयुटीवर व पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, टाटा सफारी कार क्र. एमएच/40/एसी/4450 यामध्ये 4 ते 5 इसम दारू पित बसलेले आहे व त्यांचे कडे देसी कट्टा आहे. अशी माहिती मिळाल्यावरून स्टाफने जावून खात्री केली असता आरोपी क्र. 1) राकेश मोहन गाडेकर, वय 30 वर्ष रा. मॉडल स्कुल एरिया, कोराडी नागपूर यांचे कडे कमरेला लटकवलेला एक

देशी बनावटीचा कट्टा व 03 जिवंत काडतुस कि. 15,000 रू व टाटा सफारी कार क्र. एमएच/40/एसी/4450 असा एकुण 10,00,000 रू चा मुद्येमाल मिळून आला. घटनास्थळावरून आरोपी विनय पुरूषोत्तम भांगे, वय 25 वर्ष रा. भांगे विहार त्रिमुर्ती नगर, हा पळून गेला होता. त्याचा ही शोध घेवून त्यास अटक करण्यात आली आहे. याती आरोपी नामे राकेश मोहन गाडेकर, वय 30 वर्ष हा खापरखेडा परिसरातील कुख्यात गुंड असून त्याचे वर खापरखेडा, कोराडी, चंद्रपुर, वर्धा येथे खुन, खुनासाठी अपहरण करणे, विनयभंग करणे, दरोडयाची तयारी करणे, अवैधरित्या शस्त्र बाळगणे, मारहाण करणे, दहशत माजवणे, असे 16 गुन्हे दाखल आहेत. तसेच नमुद आरोपी हा पोलीस स्टेशन कोराडी येथे विनयभगांचे गुन्हयात मागील 04 महिन्यापासुन फरार आहे. आरोपी क्र. 1) राकेश मोहन गाडेकर, वय 30 वर्ष रा. मॉडल स्कुल एरिया, कोराडी, 2) निलेश जानकीप्रसाद डहरीया, वय 27 वर्ष रा. वार्ड कं. 1, खापरखेडा, 3) महेश भयाचजी बरगट, वय 35 वर्ष रा. सुभाष वार्ड रामटेक, नागपूर 4) संजय शिवनारायण कंबाले, वय 30 वर्ष रा. आमडी फाटा रामटेक, नागपूर 5) विनय पुरूषोत्तम भांगे, वय 25 वर्ष रा. भांगे विहार, त्रिमुर्ती नगर, अटक करण्यात आली आहे. त्यांना मा. न्यायालयाने 02 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. 1, श्री. विवेक मसाळ, सपोआ सोनेगाव विभाग, श्री. अशोक सरंबळकर, वपोनि प्रतापनगर श्री. राजेद्र पाठक, सपेनि सचिन शिरके, नापोशि चंद्रमणी, गयाप्रसाद यादव, पोशि संदीप यादव, राहुल टापरे, श्रीकात कनोजिया, नापोशि अभिशेक हरदास, पोशि सतिश ठाकरे, सतिश येसनकर, आनंद यादव, अतुल तलमले, धर्मेद यादव, विद्याधर बक्षी, प्रविण फलके, सिध्दार्थ खंडारे, यांनी केली आहे.

<u>2) वाहुतक विभागामार्फत बिशॉप कॉटन हायस्कुलचे विद्यार्थ्याना सी.ओ.सी. ची माहिती दिल्याबाबत :</u>

नागपूर वाहतुक विभागातंर्गत रस्ता सुरक्षा दलातर्फे बिशॉप कॉटन हायस्कुल सदर नागपूर येथे आठवी, नववी चे 70 विद्यार्थ्याना सिटी ऑपरेशन सेंटर (सीओसी) येथील प्रणालीची माहिती मा. श्री. राजतिलक रौशन, पोलीस उपआयुक्त (वाहतुक) यांचे मार्गदर्शनाखाली देण्यात आली.

नागपूर शहरामध्ये स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत 3600 एचडी कॅमेरे बसविण्यात आले असून याव्दारे रहदारीत नियमाचा भंग करणारे, अपराध करणारे यांचे व्हिडीयो चित्रण कसे होते ? मागील दिवसाच्या घटना कशा स्टोर होतात ? ई चालनची पध्दती, सर्व कॅमेरे कसे कार्य करतात ? इत्यादी माहिती सीओसी येथील आयटी इंजिनियर अभिनव बांते, अतुल बोरकर, व अनुप लाहोटी यांनी दिली. बिशॉप कॉटन स्कुलचे शिक्षक व्ही. एन. कुलकणी व अनि सारवे यांनी रस्ता सुरक्षा दलाचे पोनि वजीर शेख, सपोनि सोनु झामरे, पोलीस कर्मचारी अतुल आगरकर, निलेश ठाकरे, शांताराम ठोंबरे, महिला पोलीस कर्मचारी मंजुषा पांडे व स्नेहल राउत यांचे मदतीने या माहिती सत्राचे आयोजन केले.

सी.ओ.सी. मध्ये विद्यार्थ्याना प्रथमच प्रवेश देण्यात येवून वाहतुक विभागाच्या उच्च तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात आल्याने विद्यार्थ्यानी व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.






 

## दिनांक 16.12.2018

**1) पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. श्री भूषणकुमार उपाध्याय यांचे लोकमत वृत्तपत्रात प्रकाशीत झालेल्या लेखांचे पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाबाबत :**

आज दिनांक 16.12.2018 रोजी दुपारी 1630 वा पोलीस जिमखाना, रामगीरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर येथे डॉ. श्री भूषणकुमार उपाध्याय यांचे लोकमत वृत्तपत्रात प्रकाशीत झालेल्या लेखांचे पुस्तक "सर्वे भवंन्तु सुखिनः" या मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकांचा प्रकाशन कार्यक्रम मा. ना. श्री देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महा. राज्य यांच्या शुभहस्ते तसेच मा.ना.श्री नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री रस्ते व सडक परिवहन महामार्ग, भारत सरकार व मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे, पालक मंत्री नागपूर जिल्हा, मा. श्री विजय दर्डा, मा. खासदार व अध्यक्ष लोकमत मिडीया ग्रुप यांचे प्रमुख उपस्थीतीत पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रम पार पाडला. सदर कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून झाले तसेच मान्यवरांनी "सर्वे भवंन्तु सुखिनः" या मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन केले.

सदर कार्यक्रमात मा. पोलीस आयुक्त, डॉ. श्री भूषणकुमार उपाध्याय, यांनी पुस्तकातील लेखांबद्दल आपले विचार मांडले त्यामध्ये त्यांनी सांगीतले कि, मी मागील चार वर्षा पासुन लोकमत या वृत्तपत्रात अध्यापण या कॉलम मध्ये लेख लिहीत होतो. आतापर्यंत 130 लेख प्रकाशन झाले असून त्यापैकी निवडक 60 लेखांचे "सर्वे भवंन्तु सुखिनः" हे पुस्तक तयार केले आहे. सदर पुस्तक हे माझ्या बॅचचे सर्व भारतीय पोलीस सेवेतील कार्यरत असणा—या अधिका—यांना पाठवणार असून त्यांच्या आग्रहास्तव सदर पुस्तकाचे हिंदी व इंग्रजी मध्ये प्रो. जोशी यांच्या मार्गदर्शनाने अनुवाद केले आहे. असे त्यांनी सागीतले आहे. तसेच सदर पुस्तकामध्ये दोन गोष्टीला महत्व दिले आहे. त्यामध्ये 1) "वसुदेवंमः कुटूंबकंमः" म्हणजे भारतीय संस्कृती पुर्ण जगात आपली समजली जाते. 2) मनाची मशागत कसे करावे, मनावर नियंत्रण कसे ठेवावे ज्याला आपण युगशास्त्र असे हि म्हणतो याचाच अर्थ जो आपले मन जिंकतो तो सर्व काही जिंकतो आजच्या काळामध्ये मानसांनी मनावर नियंत्रण ठेवले तर तो सर्व काही मिळवून शकतो. टाईम मॅनेजमेंन्ट, मॅन मॅनेजमेंन्ट यापेक्षा हि माईंड मॅनेजमेंन्ट महत्वाचे आहे. या लेखा मध्ये बुध्दांचे विचारांचा खुप मोठा प्रभाव आहे. तसेच जगामध्ये जे जे प्रभावी लोक आहेत त्यांची सुध्दा छोटे छोटे सुविचार नमुद आहे. आपण सर्वांनी हे पुस्तक आर्वजुन वाचावे जणे करून आपल्या मनातील नकारात्मक विचार जावून सकारात्मकते कडे आपली वाटचाल होईल. व सर्वत्र शांतता राहील असे बोलुन सदर पुस्तकाचे प्रकाशक श्री मनोज अंबिके, माय मिरर पब्लीसिंग हाऊस प्रा.लि. यांचे आभार मानले. तसेच सदर कार्यक्रमा दरम्यान मा. श्री विजय दर्डा, मा. खासदार तसेच मा.ना.श्री नितीनजी गडकरी, यांनी पुस्तकातील लेखांबद्दल प्रशंसा करून पोलीस आयुक्त यांचे कौतुक केले.

मा. ना. श्री देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महा. राज्य यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना पोलीस आयुक्त यांच्या लेखाबद्दल प्रशंसा करून त्यांनी सर्व सामन्य जनते करीता सोप्या भाषेत, त्यांच्या प्रचंड विचारांचा एक खजीनाच आपल्या पर्यंत पोहचवीला असल्याचे गौरवोद्गार काढले. तसेच सदर पुस्तकाचे महत्वपुर्ण विशेषतः म्हणजे ते कोणत्याही पाना पासून वाचता येते तसेच प्रत्येक लेख हा दोन ते तिन पानाचाच असून प्रत्येक लेखाचे विचारधन वेगवेगळे आहे. "सर्वे भवंन्तु सुखिनः" हा

महत्वाचा संदेश या पुस्तकाचे माध्यमातुन दिलेला आहे. या पुस्तकांतील सर्व लेखां पैकी अत्यंत महत्वाचा लेख म्हणजे गुरू परिस्थीती बदलत नाही तो फक्त विचार बदलतो. श्रध्दा आणि अंधश्रध्दा या मध्ये पुसटशी रेष असते श्रध्देने ती पार केल्यास ती अंधश्रध्दा होते. त्यामुळे समाजात जगत असतांना सर्वांना येणा—या दुखःकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलुन सकारात्मक विचाराने सुखाने जगता येते असा मोलाचा संदेश देखील त्यांनी आपल्या भाषनात दिला. पोलीस आयुक्त, यांनी आपला व्यवसाय प्रचंड तनावाखाली दररोज येणारी नविन आव्हाने यां कडे सकारात्मक पणे पाहुन त्यांना आलेले अनुभव या लेखातुन पुस्तकाचे रूपात समोर आले आहे. आपण सर्व पोलीस विभागातील लोकांनी हे पुस्तक जरूर वाचावे जणेकरून आपल्यातील नकारात्मक दृष्टीकोण दुर होवून सकारात्मकते कडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलेल.

सदर कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार प्रदर्शन मा. पोलीस उपआयुक्त, श्री राहुल माकणीकर, परि क्र. 3 यांनी केले असून कार्यक्रमाकरीता नागपूर शहरातील सर्व प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार तसेच सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.
















## <u>दिनांक 20.12.2018</u>

<u>1) गुन्हे शाखा युनिट क. 3 पोलीसांची कामगिरी :</u>

फिर्यादी भरत बाडेवाले, एसएनडीएल, कार्यालय, जुनी शुक्रवारी, येथे अभियंता असुन ते त्याचे पथकासह तांडापेठ, लाल दरवाजा येथे राहणारा यातील आरोपी क्र. 1) भास्कर गजानन निमजे, वय 68 वर्ष रा. लाल दरवाजा, तांडापेठ, पो.टे. पाचपावली, नागपूर याचे घरी विद्युत मिटरची पडताळणी करीत असतांना आरोपीने विद्युत पोल वरून सरळ केबल आपले मिटरमध्ये जोडुन विद्युत प्रवाहाचा वापर करून विज चोरी केल्याचे व त्याचे या कृत्यास यातील आरोपी क्र. 2) निलेश रमेश नंदनवार, वय 30 वर्ष रा. नाईक तलाव, बांग्लादेश, पाचपावली, नागपूर याने एसएनडीएल चा कर्मचारी भासवुन त्याचेकडुन 5,000 रू घेवून एसएनडीएल चे बनावट मिटर बसवुन देवून एसएनडीएल कंपनीची फसवणुक केली नमुद ठिकाणी फिर्यादी व पथकाने आरोपी क्र 2 यास घटनास्थळी बोलावून त्यास मिटर व विज चोरीबाबत विचाराण केली असता त्याने उडवाउडविचे उत्तरे देवून नमुद ठिकाणाहुन पळून गेला होता. फिर्यादीचे रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.

अशा प्रकारचे अनेक विज चोरीचे प्रकरणे असुन गुन्हयाची व्यापती मोठी असल्याने मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांनी सदर गुन्हयाचा तपास गुन्हेशाखा मार्फत करावा असे आदेश दिल्याने गुन्हे शाखा युनिट क्र. 3 चे पोनि जग्वेद्रसिंग राजपुत यांनी गुन्हयाचे अधिक तपासात पळुन गेलेला आरोपी क्र. 2 निलेश नंदनवार यास ताब्यात घेवून विचारपुस करता त्याने नमुद गुन्हा केल्याचे सांगितल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आले. दरम्यान त्याने ज्या–ज्या ठिकाणी बोगस मिटर बसविलेले होते असे 1) एसएनडीएल कंपनीचे मिटर टेस्टिगचे बनावटी फार्म 2) बनावट मिटर फार्म 3) मिटर बसविण्याकरीता वापरण्यात येणारे लाकडी बोर्ड 4) ड्रिल मशिन 5) हॉट ग्लुगन व ग्लु बॉक्स, 6) मल्टीमिटर, 7) विद्युत अर्थिग व केबल वायर असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे व मिटर बसविण्यासाठीच साहित्या व मिटर मध्ये छेडछाड करण्याचे सर्व साहित्य जप्त करण्यात आलेले आहे. सदर आरोपी हा एसएनडीएल कंपनीचा कर्मचारी असल्याचे लाकांनाभासवून त्याचे नावे बोगस फार्म भरून घेवून त्यांना स्वतः दुकानातुन मिटर विकत आणुन किंवा बंद घराचे किंवा विद्युत प्रवाह खंडीत केलेले विजेचे मिटर काढुन ते बोगस लावून देवून त्याचेकडुन प्रत्यकी 10 ते 12 हजार रूपये घेत असे. तसचे लावून दिलेले बोगस मीटरचे बीलसुध्दा लोकांना एसएनडीएल कंपनीचे बिल येत नसे. तसेच अधिकृत विद्युत मिटरमध्ये छेडछाड करून मिटर मध्ये रिडिंग कमी प्रमाणात येईल अशी जोडणी करून एसएनडीएल कंपनीची नुकसान करून एसएनडीएल व लोकांची फसवणुक केली. आतापर्यत वीज चोरी करणारे आरोपी क्र.. 1) भास्कर निमजेसह एकुण 16 लोकांवर कार्यवाही करण्यात आली आहे. अटक आरोपी निलेश नंदनवार याचा पीसीआर प्राप्त करून गुन्हयाचा तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, डिटेक्शन श्री. संभाजी कदम, मा. सपोआ श्री. संजीव कांबळे, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्ह शाखा युनिट क्र. 3 चे अधिकारी पोनि जग्वेंद्रसिंग राजपुत, पोउपनि माधव शिंदे, मंगला मोकाशे, पोहवा रफिक खान, शैलेश पाटील, विठ्ठल नासरे, रामचंद्र कारेमोरे, अरूण धर्मे, नापोशि दयाशंकर बिसांद्रे, राकेश यादव, पोशि विकास पाठक, हरीष बावणे यांनी केली आहे.



## दिनांक 21.12.2018

1) आर्थिक गुन्हे शाखा पोलीसांची कामगिरी :

समृध्द जिवन मल्टीस्टेट मल्ट्रीपरपज को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड कंपनीचे संचालक मंळातील आरोपीतांनी मिळून सन 2012 मध्ये 4 था माळा, तंत्र बिल्डींग, यशोधन बिझनेस कॉम्पलेक्स, घोले रोड, शिवाजी नगर, पुणे येथे मुख्य शाखेची जनरल रजिस्ट्रार ऑफ को ऑपरेटिव्ह सोसायटी मिनीस्ट्री ऑफ अॅग्री कल्चर डिपार्टमेंट अॅन्ड कॉरप्रेशन नवी दिल्ली येथे रजिस्ट्रेशन करून संस्थेची स्थापना केली होती. सदर सोसायटीला स्थापने दरम्यान परवानगी प्रदान करण्यात आली होती.

सन 2014 मध्ये आरोपीतांनी समृध्द जिवन मल्टीस्टेट मल्टीपरपज को ऑपरेटिव्ह सोसायटी, नावाने खुल्लुर चेंबर, बॅक ऑफ बडोदा चे वर मुंजे चौक सिताबर्डी, नागपूर येथे शाखा उघडुन फिर्यादी व इतर लोकांना एजंट लोकांचे माध्यमाने कंपनीचे कामकाजाबाबत थोडक्यात माहिती दिली की, सोसायटी मार्फत दुधपुरवठा केला जातो व पुण्यामध्ये समृध्द मिल्क नावाने दुधपुरवठा करण्यात येत आहे. तसेच पुण्याचे तीन फाईव्ही स्टार हॉटेल व लाईव्ह इंडिया न्युज चॅनलसुध्दा सोसायटीचे मालकीचे आहे. तसेच कंपनीचे मालकीची 300 एकर जमीन पुणे व अकोला येथे असुन सदर जमीनीमध्ये सोसायटी कडुन जनावरांचे पालन पोषन केले जाते. सोसायटी कडुन गुंतवणुकदारांना दुध देणारे जनावरे विकल्या जातील व त्या जनावरांचे पालनपोषनाचा करार सोसयटीसोबत करार करून सोसायटीला सहा वर्ष/साडेपाच वर्षाकरीता द्यायची. सहा वर्षाचा करार केल्यास दरवर्षी सोसायटी आपल्याला 16 टक्के वार्षिक व्याज गुंतविलेल्या रकमेवर परतांवा देईल तसेच सहा वर्षानंतर केलेल्या गुंतवणुकीची मुळ रक्कम सुध्दा गुंतवणुकदारांना परत करण्यात येईल तसेच साडे पाच वर्षाचा करार केल्यास सोसायटी गुंतवणुक केलेल्या रक्कमेची साडेपाच वर्षानंतर दुप्पट रक्कम देण्यात येईल अशी योजना सोसायटी मार्फत राबविण्यात येत होती.

समृध्द जिवन मल्टीस्टेट मल्टीपपर्ज को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या सोसायटीने महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश येथे आपले सोसायटीचे सब कार्यालय उघडुन गुंतवणुक दारांना अधिक परताव्याचे आमिष दाखवून कंपनीच्या खोटया योजना सांगुन त्यांचेकडुन सोसायटी मध्ये गुंतवणुक केल्याबाबतचे करारनामे तयार करून करारनामा प्रमाणे गुंतवणुक दारांना परतावा न देता त्यांची फसवणुक झाल्याने पोस्टे. सिताबर्डी, नागपूर शहर येथे अप.क्र. 90/18 कलम 420,406,120(ब) भादंवि सहकलम 3 एमपीआयडी, 1999 अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस उपआयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि बि.एस. नरके हे करीत आहे.

या प्रसिध्दी व्दारे जनतेला आवाहन करण्यात येते की, ज्यांची ज्यांची समृध्दी जिन मल्टीस्टेट मल्टीपर्पज को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड माध्यमाने फसवणुक झाली आहे. त्यांनी सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी श्री. बी.एस. नरके, सा. पोलीस निरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा नागपूर शहर संपर्क क्र. 9527921500 वर संपर्क साधावा. किंवा पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, कार्यालय प्रशासकीय इमारत क्र. 1, येथील चौथा माळा, सिव्हील लाईन, नागपूर या कार्यालयात आपली तक्रारी नोंदवावी.

## दिनांक 25.12.2018

1) पो.स्टे. सक्करदरा, येथील गुन्ह्यात पाहीजे असलेला आरोपी नामे रूपचंद उर्फ भु—या नागो सहारे वय 70 वर्ष रा रामबाग, पो.स्टे. इमामवाडा, नागपुर यास 35 वर्षानंतर अटक केल्याबाबत :

मा. पोलीस उप आयुक्त, श्री निलेश भरणे, परि. क्र. 04, नागपुर शहर यांचे आदेशान्वये पो. स्टे. सक्करदरा, येथील येथील फरार व पाहीजे असलेले आरोपीतांचा जास्तीत जास्त शोध घेणे व सध्या पो.स्टे. हद्दीबाहेर राहत असलेले आरोपीतांबाबत गोपनिय माहिती काढुन त्यांचा विविध भागात शोध घेणेबाबतचे आदेश देण्यात आले होते. त्यावरून दि 22/12/2018 रोजी मा. प्रथमश्रेणी, नयायदंडाधिकारी, महानगर पालीका, न्या. क्र. 01, नागपुर यांचेकडुन आरोपी व्यक्तीस उपस्थीत राहण्यास फर्मावणारा उदघोषना कलम 82 नुसार वर नमुद आरोपीताचा शोध घेणेबाबत जाहीरनामा

प्राप्त झालेला होता. त्यानुसार पुढे त्या आरोपीबाबत गुप्त माहिती काढण्यात आली होती. त्या माहितीच्या आधारावर संभावित गाव जुनोना या गावात दिर्घ काळापासुन असलेबाबतची माहिती प्राप्त झाल्याने लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना थोडक्यात हकिगत सांगुन तपास पथकाची मदत घेवुन लागलीच त्याचे राहते गावी जावुन नमुद आरोपीतास ताब्यात घेण्यात आले. व पो.स्टे. आणून चौकशी करण्यात आली. त्याचेवर घरफोडीचे एकुण 18 गुन्हे दाखल असलेबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. नमुद आरोपीसबंधात कायदेशिर प्रकिया करून त्यास मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दि 05/01/2019 पावेतो मा. न्यायालयीन कोठडीत मध्यवर्ती कारागृह, नागपुर येथे दाखल करण्यात आले. तत्पुर्वी एकुण फरार पाहीजे व जाहीरनामा नुसार आरोपीतांची माहिती काढुन आज पावेतो 12 (मृत्यु प्रमाणपत्र + अटक) आरोपींवर कायदेशिर कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई मा. पोलीस उप आयुक्त. परि.क्र. 4, श्री निलेश भरणे, नागपुर यांचे मार्गदर्शनात सक्करदरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सदींपान पवार, पोनि गुन्हे श्री सुनिल चव्हाण, सपोनि. श्री उल्हास भुसारी, पोउपनि मनोज ओरके, पोहवा विलास चोबीतकर, पोहवा अरूण खेरगडे, पोना शालीराम शेंन्डे, पोशि पवन लांबट यांनी कारवाई केली.